**सं.फौ.ख. क्र. ६६५/२०२२**

MHNS140015542022

| | | |
|---|---|---|
| खटला दाखल दिनांक | : | १५/१०/२०२२ |
| खटला नोंदणी दिनांक | : | १५/१०/२०२२ |
| खटला निकाल दिनांक | : | ०८/०१/२०२४ |
| कालावधी | : | वर्षे महिने दिवस<br>**०१ ०२ २४** |

| | |
|---|---|
| **दिंडोरी येथील न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, जि. नाशिक यांचे न्यायालयात,**<br>**(पीठासीन अधिकारी : श्रीमती. के.एन.गोवारीकर )** | |
| **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ६६५/२०२२ निशाणी** | |
| प्रथम खबर/गुन्हा आणि पोलिस ठाणे<br>गुन्हा क्रमांक १६६/२०२२ मुंबई पोव्हीबीशन कायदा कलम ६५(ई) प्रमाणे | |
| **अभियोगपक्ष.** | महाराष्ट्र सरकार,<br>व्दारा दिंडोरी पोलीस स्टेशन, दिंडोरी. |
| **अभियोगपक्षातर्फे अभियोक्ताः-** | श्री.आर.बी.वळवी. |
| **आरोपी.** | १. शिवाजी एकनाथ सोनवणे, वय – ४२ वर्षे.<br>रा. नळवाडपाडा,<br>ता. दिंडोरी, जि. नाशिक. |
| **आरोपीतर्फे विधीज्ञः-** | श्री.पी.एस.देशमुख |

**भाग-ब.**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक. | २१/०७/२०२२ |
| गुन्हा दाखल झाल्याचा दिनांक. | २१/०७/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक. | १४/१०/२०२२ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक. | १७/०७/२०२३ |
| प्रकरण पुराव्याला निश्चीत केल्याचा दिनांक. | १८/१०/२०२३ |
| प्रकरण न्यायनिर्णया करिता निश्चीत केल्याचा दिनांक. | ०८/०१/२०२४ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयाचा दिनांक. | ०८/०१/२०२४ |
| शिक्षेचा आदेश दिल्याची दिनांक, इतर काही. | ०८/०१/२०२४ |

## <u>आरोपी बाबतचा तपशील.</u>

| आरोपी क्रमांक . | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख. | जामीनावर सोडल्याची तारीख. | दाखल गुन्हा कलम. | शिक्षा किंवा दोषमुक्त केले ? | दिलेली शिक्षा. | प्रकरणा दरम्यान तुरुंगात असल्याचा कालावधी कलम ४२८ फौ.प्र.स. साठी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शिवाजी एकनाथ सोनवणे | २१/०७/२०२२ | २१/०७/२०२२ | मुंबई पोव्हीबीशन कायदा कलम ६५(ई) प्रमाणे. | निर्दोष | निरंक | निरंक |

अभियोग/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**अ. सरकारपक्ष.**

| क्रमांक | नांव | साक्षीचा प्रकार |
|---|---|---|
| साक्षीदार क्र. १ | पुंडलिक लक्ष्मण गायकवाड (नि. १०) | पंच साक्षीदार |
| साक्षीदार क्र. २ | भिका एकनाथ शिंदे (नि. १२) | पंच साक्षीदार |

**ब. बचावपक्षाचे साक्षीदार.**

| क्रमांक | नांव | साक्षीचा प्रकार |
|---|---|---|
| - | - | - |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| क्रमांक | नांव | साक्षीचा प्रकार |
|---|---|---|
| - | - | - |

अभियोग/बचावपक्ष/न्यायालयीन कागदपत्रंची यादी व निशाण्या

**अ. अभियोगपक्ष**

| क्रमांक | नांव | साक्षीचा प्रकार |
| --- | --- | --- |
| - | - | - |

**ब. बचावपक्षाचे साक्षीदार**

| क्रमांक | नांव | साक्षीचा प्रकार |
| --- | --- | --- |
| - | - | - |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| क्रमांक | नांव | साक्षीचा प्रकार |
| --- | --- | --- |
| - | - | - |

**ड. महत्वपुर्ण वस्तु / जप्त मुददेमाल**

| क्रमांक | निशाणी क्र. | तपशील |
| --- | --- | --- |
| १ | - | देशी दारु प्रिंन्स संत्रा कंपनीच्या १८० मि.ली. क्षमतेच्या एकुण ३८ सिलबंद काचेच्या बाटल्या. |

<u>न्यायनिर्णय</u>

**(**दिनांक ०८ जानेवारी**,** २०२४**)**

प्रस्तुत खटला आरोपी विरुध्द मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये चालविण्यात आला.

<u>प्रस्तुत खटल्याची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे **-**</u>

<u>०२</u> फिर्यादी यांनी दिनांक २१/०७/२०२२ रोजी फिर्यादी दिली की, नळवाडपाडा, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक येथे एक इसम त्याच्या राहत्या घरी अवैध्यरित्या देशी दारु बाळगुन तिची विक्री करत असल्याची बातमी मिळाल्याने ते, इतर कर्मचारी व दोन पंचाना सोबत घेवून घटनास्थळी जावून छापा टाकला असता त्यांना आरोपी नामे शिवाजी एकनाथ सोनवणे याच्या ताब्यात देशीदारुच्या ३८ बाटल्या मिळुन आल्या. त्यामुळे आरोपींवर महाराष्ट दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये दोषारोपपत्र ठेवण्यात आले आहे.

<u>०३</u> आरोपीवर निशाणी क्र.०९-अ वर दोषारोप ठेवण्यात आला. त्याला गुन्हा

कबुल नसल्याचे त्याने सांगितले व खटला चालवण्याची तयारी दर्शवली. आरोपी विरुध्द पुरावा मिळुन न आल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोदंविण्यात आलेले नाही.

०४ अभियोगपक्षाचे तथ्यकथन वरुन प्रस्तुत प्रकरणात न्यायनिर्णय होण्याकरीता खालील मुददे उपस्थित् होतात. त्यावर निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दिनांक २१/०७/२०२२ रोजी मौजे नळवाडपाडा, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे राहते घराचे पाठीमागे आरोपीच्या ताब्यात देशी दारुच्या एकुण ३८ सिलबंद बाटल्या मिळुन आल्या हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| २ | अंतिम आदेश ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले. |

**- कारणमिमांसा -**

मुददे क्र. ०१ साठी -

**०५.** आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षा तर्फे पंच साक्षीदार क्र. १ श्री पुंडलिक लक्ष्मण गायकवाड यांची साक्ष नि.१० वर व पंच साक्षीदार क्रमांक २ भिका एकनाथ शिंदे यांची साक्ष निशाणी १२ वर नोंदवली, त्यात त्यांनी असे सांगितले की, त्यांना पंचनाम्या साठी पोलीसांनी बोलावीले नव्हते, त्याबददत त्यांना काही एक माहित नाही, परंतु पंचनामयावर त्यांची सही असल्याचे मान्य केले आहे. सदर साक्षीदार अभियोग पक्षास मदत करीत नसल्यामुळे त्याचा उलटतपास घेण्यात आला त्यामध्ये सदर साक्षीदाराने आरेपी विरुध्द गुन्हयाचे दायीत्व येईल असे काहीही सांगितलेले नाही.

**०६.** पंच साक्षीदाराच्या व्यतिरिक्त अभियोग पक्षाने फिर्यादी, तपासी अंमलदार अथवा इतर कोणत्याही साक्षीदाराची साक्ष अनेक संधी देवून देखील नोदंविलेली नाही. तसेच अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या एकमेव पंच साक्षीदार याने देखील अभियोग

पक्षास मदत न केल्यामुळे पंचनमा शाबीत झालेला नाही. अभियोग पक्षातर्फे रासायनिक पृथकरणाचा अहवा दाखल करण्यात आलेला नाही त्यामुळे जप्त केलेला मुददेमाल हा दारुच होता हे देखील शाबीत झालेले नाही. सबब अभियोग पक्षाने दाखल केलेल्या पुराव्यावरुन आरोपीविरुध्द कोणत्याही गुन्हयाचे घटक शाबीत न झाल्यामुळे मी मुददा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

मुददे क्र. ०२ साठी -

०७. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ अन्वये वैयक्तीक जात मुचलका दिलेला आहे. सबब मी मुददा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी दिलेले असल्यामुळे मी त्या अनुशंगाने खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) आरोपी शिवाजी एकनाथ सोनवणे याची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) प्रमाणे, मुंबई दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) च्या अपराधातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) त्याचे वैयक्तिक बंधपत्र व जामीन रदद करण्यात येतो.

३) आरोपीचे कलम ४३७(अ) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या अंमलबजावणी अन्वये रक्कम रुपये १५,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र दयावे.

४) जप्त मुददेमाल देशी दारु प्रिंन्स संत्रा कंपनीच्या ३८ सिलबंद काचेच्या बाटल्या अपील कालावधी संपल्या नंतर राजय उत्पादन शुल्क यांच्या कडे पाठविण्यात याव्या.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

**(के.एन.गोवारीकर )**
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग.,
दिंडोरी,
(एम.एच २७३७)

दिनांक - ०८/०१/२०२४.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | R. P. Deore |
| Name of the Court | K.N.Gowariker, Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate First Class, Dindori. |
| Date of Dictation | 08/01/2024 |
| Judgment signed by the P.O. on | 08/01/2024 |
| Judgment uploaded on | 10/01/2024(Digital signature could not be affixed due to its expiry. |